DESICOLAB
Shaping The Future Of Indian Innovation

# कोर्सचा प्रस्ताव

शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रमाणित कोर्स

# इनोवेशन स्कूल फॉर चिल्ड्रन

(इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी)



# प्रास्ताविक

आधुनिक, तंत्रज्ञानामुळे वेगाने बदलत असणाऱ्या जगात विद्यार्थ्यांसाठी शाळा आणि शाळेबाहेरील वातावरण अत्यंत स्पर्धात्मक आहे. त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात वेगवेगळ्या आव्हानात्मक परिस्थितींचा सामना करण्यास त्यांना समर्थ असणे आवश्यक आहे.

**प्रॉब्लम सोल्व्हिंग आणि लीडरशिप** ही मुख्य जीवन कौशल्ये आहेत जी लहान वयातच शिकणे आणि त्यांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. आमचा विश्वास आहे की जर मुलांना योग्य कौशल्ये आणि प्रशिक्षण दिले गेले असेल तर त्यांना आसपासच्या समस्या सोडवण्याची उच्च क्षमता आणि ज्ञान प्राप्त होऊ शकते. ते नाविन्यपूर्ण कल्पना, प्रभावी उपाय आणि त्यांची अंमलबजावणी करू शकतात. मुलांना संधी समजून घेण्यासाठी समस्यांकडे कसे पहायचे आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी समस्येची पडताळणी करून साजेशे उपाय कसे शोधावे हे शिकवले गेले तर त्यांच्यात प्रचंड आत्मविश्वास येतो. त्यांच्या मानसिकतेत बदल होण्याबरोबरच आयुष्यातील समस्यांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक होत जातो.

या कोर्सच्या माध्यमातून आम्ही मुलांना सभोवतालच्या नवीन संधी / समस्या शोधण्यासाठी आणि त्यांच्या निराकरणासाठी प्रशिक्षण देऊन तसा सराव त्यांच्याकडून करून घेतो. आम्ही त्यांना समस्या निराकरण, मानव केंद्रीत डिझाइन आणि इनोव्हेशन या विषयांवर प्रशिक्षण देतो. या कोर्समुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना केवळ पुस्तकी न राहता त्यांना त्या प्रत्यक्षात राबावण्याची संधी निर्माण होते.

मुलांना विविध साधने आणि तंत्रे वापरण्याचा अनुभव मिळतो तसेच नवनवीन गोष्टी शिकण्याची त्यांची जिज्ञासा वाढीस लागते. विचाराधीन असलेल्या समस्यांसाठी नाविन्यपूर्ण उत्पादन, सेवा आणि उपाय तसेच तांत्रिक संकल्पना निर्माण करण्यासाठी आम्ही त्यांना सुलभ पद्धतीने मार्गदर्शन करतो. या संकल्पना वास्तविक-जगाच्या गरजा सोडवतात आणि संभाव्यत: बरेच समाजोपयोगी परिणाम तसेच नावीन्यपूर्ण मूल्यनिर्मिती करतात.

हा कोर्स विद्यार्थ्यांधील सृजनशीलता वाढवतो व शालेय जीवनातच त्यांना ईनोवेटर बनण्यासाठी सुसज्ज करतो.

# कोर्सची उद्दिष्टे आणि अपेक्षित परिणाम

## शिकण्याचे उद्दिष्ट

1. संधी किंवा समस्या सर्जनशीलपणे कशा शोधायच्या
2. संधी आणि समस्या समजून घेऊन नव्या संकल्पना कशा तयार कराव्या
3. टीममधील इतरांसह सहयोग कसा आणि उपाययोजनाची सह-निर्मिती कशी करावी
4. विविध टप्पे लक्षात घेऊन डिझाइन आणि नाविन्यपूर्ण तंत्रांची विविध साधने कशी वापरायची
5. सोल्यूशन्सची प्रोटोटाइप कशी करावी, त्यांची चाचणी कशी घ्यावी आणि ती इतरांना कशी पटवून द्यावी
6. शोधलेले उपाय योजनाबद्ध पद्धतीने कसे राबवावेत

## अपेक्षित परिणाम

1. मुलांमध्ये सृजनशीलता, नाविन्यपूर्ण पद्धतीने समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित होणे
2. शालेय उपक्रमात इंनोवेशन, डिझाइन आणि सृजनशीलतेच्या विविध साधनांचा व तंत्राचा वापर
3. नवीन कौशल्ये वाढवून समाजात किंवा मुलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे
4. मुलांचा व्यावहारिक जीवनाचा अभ्यास घडवून त्याची प्रचिती देणे

## सहभागी मुलांकरिता लाभ

1. आयआयटीसारख्या संस्थातिल तसेच इतर नामांकित मार्गदर्शकांकडून शिकण्याची संधी.
2. नाविन्यपूर्ण कल्पना, प्रकल्प विकसित करण्याची संधी आणि बक्षिसे जिंकण्याची संधी.
3. अभ्यासक्रमाच्या शेवटी प्रख्यात प्रदर्शन केंद्रांमध्ये प्रकल्प पाठवण्याची संधी.
4. सहभागासाठी आणि उत्कृष्ठ कामगिरीसाठी प्रमाणपत्रे तसेच इतर सहकार्य व मदत.

# कोर्सची रूपरेषा

1. **संधी मॅपिंग:** सर्वेक्षण, शोध, समस्या विश्लेषण, समस्या व्याख्या/परिभाषा आणि कल्पना-निर्मिती — 4 आठवडे
2. **नवसंकल्पनेची निर्मिती:** Design Thinking, नाविन्यपूर्ण पद्धती(Innovation Methods), साधने(Tools) आणि केस स्टडीज, नवीन मूल्य-प्रस्तावाची रचना — 6 आठवडे
3. **बिल्डिंग सोल्यूशन्स:** मॉकअप्स (प्रतिकृति), प्रोटोटाइपिंग आणि सुधारणा (रिफायनिंग) — 10 आठवडे
4. **आयडिया पिचिंग आणि सादरीकरण:** कथाकथन, सादरीकरणाची कौशल्ये — 4 आठवडे
5. **चाचणी आणि अंमलबजावणी:** समाधान चाचणी आणि पायलट प्रकल्प अंमलबजावणी — 8 आठवडे
6. **प्रकल्प माहिती प्रसारण आणि स्केलिंगः** प्रकल्प माहितीची साधन-सामग्री, प्रकल्प वाढीसाठी मोहिमेची आखणी, उपायाचा झालेल्या परिणामाचे मोजमाप व मांडणी. — 8 आठवडे

# कोर्समधील देयक

हा कोर्स डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून घेतला जाईल तसेच प्रत्यक्षातही काही प्रोग्राम ठेवता येतील. कोर्सच्या तारखा व कोर्स संदर्भातील इतर निर्णय देसीकोलॅब आणि शाळेद्वारे मान्य केले जातील.

**कोर्स देयकामध्ये समाविष्ट आहे:**

- कोर्स 120+ तास असेल जो 40 आठवड्यांच्या कालावधीत पूर्ण होईल.
- सहसा 3 तास प्रती आठवडा (डिजिटल माध्यम) असे स्वरूप असेल
- पूर्ण कोर्सचे टूलकिट सॉफ्ट प्रतीमध्ये पुरवले जाईल
- वार्षिक दोन कार्यशाळा प्रत्यक्षात घेण्यात येतील
- शाळा किंवा आंतरशालेय स्तरावरील स्पर्धांमध्ये विनामूल्य सहभाग घेता येईल
- सहभागींना विविध टप्प्यावर मार्गदर्शन प्राप्त होईल
- सहभागींना कोर्समध्ये वापरल्या जाणाऱ्या विविध साधने, तंत्र आणि संकल्पनांच्या सखोल अभ्यासाचे पुढील संदर्भ मिळतील
- सहभाग आणि उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र दिले जाईल

# आमच्या मागील कार्यक्रमांचे काही अनुभव



**Topic:** Pune Innovation Jam- 2015 for School Children
**Host/ Partner:** PCMC Science Park and Procluster, Pune
Date: February 2015
Duration: Two days



**Topic:** AGRI-BUSINESS STARTUP IDEA GENERATION
**Host/ Partner:** ADT, Baramati
Date: 6-7 September 2017
Duration: Two days



**Topic:** Agri-business startup idea generation
**Host/ Partner:** ADT, Baramati
Date: 13-14 March 2018
Duration: Two days



**Topic:** Idea generation, problem solving and prototyping
using design thinking and innovation for school children
**Host/ Partner:** ATL, BSM, KOTHARUD, PUNE
Date: November 2017
Duration: Two days



**Topic:** Startup idea generation using design thinking and innovation methods for aspiring entrepreneurs
**Host/ Partner:** CMIA and GIZ, Aurangabad
Date: 5
October 2017
Duration: One day



**Topic:** Idea generation, problem solving and prototyping using design thinking and innovation for school children
**Host/ Partner:** ATL, Saraswathi Vidyalaya, Latur
Date: August 2018
Duration: Two days



**Topic:** Design Management
**Host/ Partner:** Symbiosis School of Design, Pune.
Date: September 2018
Duration: Two days



**Topic:** Startup Bootcamp- Business Model Innovation
**Host/ Partner:** Giz and CITD, Hyderabad
Date: December 2018
Duration: Two days



**Topic:** Innovation Management
**Host/ Partner:** ADYPU, Pune Date: September 2017 Duration: Seven days




**Topic:** Building social innovation ideas using new technologies
**Host/ Partner:** Karyotype Softwares Pvt Ltd, Pune
Date: 20 August 2017
Duration: One day



**Topic:** Faculty Development Program- Design Thinking
**Host/ Partner:** ADT, Baramati Date: 10 December 2018 Duration: Two days



**Topic:** ATL, Community Day
**Host/ Partner:** ATL, BSM, KOTHARUD, PUNE
Date: 14th April 2018
Duration: One day



**Topic:** Innovation Driven Entrepreneurship
**Host/ Partner:** GIENET and PES College, Aurangabad
Date: 28 September 2018
Duration: Two days



**Topic:** Entrepreneurship Development Program
**Host/ Partner:** IGTR, Aurangabad
Date: 29 December 2018
Duration: One day



**Topic:** Innovation Methods
**Host/ Partner:** Shivaji University, Kolhapur
Duration: One day



**Topic:** Entrepreneurship Development Program- Bootcamp
**Host/ Partner:** DIC, Sangali
Duration: One day



**Topic:** Entrepreneurship Development Program
**Host/ Partner:** DIC, Kolhapur
Duration: One day



**Topic:** Pune Innovation Jam- 2016
**Host/ Partner:** DSK International School of Design
Date: March 2016
Duration: Two Day



**Topic:** Design Now Jam
**Host/ Partner:** DSK School of Design and PACO, Italy
Duration: Two Day



**Topic:** Proof of concept competition
**Host/ Partner:** MITAOE, Pune
Duration: Two Day



**Topic:** Seminar on Innovation Driven Entrepreneurship
**Host/ Partner:** iFEEL, Pune
Duration: One Day

# आमच्याविषयी थोडेसे....



देसीकोलॅब ही डिझाइन, इनोव्हेशन आणि को-वर्किंग मधील तज्ज्ञांची एक टीम असून त्यांचे विविध शाखातील शाखातज्ञही जोडलेले आहेत. आम्ही व्यवसाय, सामाजिक आणि शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी डिझाइन, इनोव्हेशन तसेच उद्योजकतेचे कोर्स शिकवतो.

आमचे ध्येय सहयोगी वातावरण तयार करुन ग्रामीण आणि शहरी भागात समस्या सोडविण्यास सशक्त तरुण नवप्रवर्तक आणि बदल करणारे तयार करणे हे आहे.

राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत उत्प्रेरक म्हणून उदयास येण्यासाठी आम्ही त्यांचे सहकार्य करतो व त्या जडणघडणीत प्रत्यक्ष योगदान देतो. आमच्या कोर्स दरम्यान सहभागी लोक विविध कौशल्ये शिकतात, डिझाइन विचारसरणीचा दृष्टीकोन आत्मसात करतात. ते समस्यांकडे पाहण्यासाठी आणि संधींचा शोध घेण्यासाठी नवीन दृष्टीकोन विकसित करतात. आम्ही त्यांना उत्पादने, सेवा, मार्केटिंग आणि व्यवसाय मॉडेलचा पुनर्विचार करण्यास मदत करतो. अत्यंत नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी त्यांच्यात सृजनशील आत्मविश्वास वाढवण्यासाठी आम्ही सक्रिय काम करतो.

बहु-अनुशासनात्मक दृष्टीकोन आणि सह-निर्मितीवर आमचा ठाम विश्वास आहे. आम्ही कंपन्या, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, एजन्सी आणि शासकीय संस्था यांच्यासह त्यांच्या समस्येच्या परिस्थितीवर पुनर्विचार करण्यास त्यांची मदत करतो.

आज पुण्यातून कार्यरत असलेले देसीकोलॅब, तरुणांमध्ये डिझाइन थिंकिंग आणि नाविन्य आणण्यासाठी अनेक उपक्रम आणि सोपे टूलकिट तयार करते. आम्ही स्टार्टअप कंपन्या आणि नवीन स्टार्ट-अप तयार करण्यासाठी त्यांचे सहकार्य  करतो. आम्ही सध्या नाविन्यपूर्ण क्षमता निर्माण करण्यासाठी शाळा, शैक्षणिक संस्था, इनक्यूबेटर, स्वयंसेवी संस्था, कंपन्या इत्यादींसह कार्य करीत आहोत. आतापर्यंत देसीकोलॅबच्या उपक्रमामधून 1000 हून अधिक इच्छुक नवनिर्माता आणि सामाजिक बदलकर्त्यांना फायदा झाला आहे.

# आम्ही काय करतो?

सहयोग आणि
सह-निर्मिती





मानवी केंद्रित रचना

नाविन्यपूर्ण पद्धती
आणि साधने





बहु-शाखिय
दृष्टीकोनाचा वापर

संकल्पना व उपायांचे
संशोधन आणि
प्रमाणीकरण





प्रोटोटाइप आणि
मूर्त स्वरूपातील
संकल्पना निर्मिती

## संपर्क


पत्ताः एलोरा शॉपी, बिल्डिंग- बी, पहिला मजला, शॉप -105, सेक्टर -1, इंद्रायणी
नगर, भोसरी, पुणे – 411039

**Email:** info@desicolab.com **Phone:** +917720022641 **Website:** www.desicolab.com